# तरंग–अंतरंग

## समकालीन पर्यावरणाची चिकित्सा

संतोष शिंत्रे



# तरंग -अंतरंग

समकालीन पर्यावरणाची चिकित्सा

**संतोष शिंत्रे**

# मनोगत

आपल्या देशातील आणि काही प्रमाणात जागतिक पातळीवरील समकालीन पर्यावरणीय वास्तवाचा शोध घेत त्यातून तुम्हा आम्हा सर्वांसाठी सुखाच्या नव्हे, पण हिताच्या काही तथ्यांचा शोध घेऊ पाहणारं माझं हे तिसरं पुस्तक. या पुस्तकातील 2014 ते 2017 सालातल्या ह्या लेखनाच्या निमित्ताने अशा शोधाला वीस वर्षे पूर्ण होतील. 1998 ते 2014 चा मध्य या काळातल्या काही प्रमुख पर्यावरणीय घटना, जाणवलेली काही सत्ये, तथ्ये यांबद्दल आधीच्या दोन पुस्तकांमधून सलग लिहिता आलं. जून 2014 ते जानेवारी 2018 मधल्या घटनांवर सदर पुस्तकातील 'तरंग' आणि 'अंतरंग' विभागांमध्ये काही टिपणी, भाष्य आणि विवेचन आहे. माझ्या स्वतःच्या पर्यावरण पत्रकारितेच्या प्रवासाची 20 वर्षे पूर्ण झाली याचा आनंद आहेच. पण वास्तव हे फार विदीर्ण करत जाणारं आहे, ही जाणीव अत्यंत वेदनादायक आहे. आपल्या विचारांमधून, रोजच्या जगण्यामधून आपण निसर्गाला केव्हाच हद्दपार करून चुकलो आहोत. परिणामी आपल्या शासनव्यवस्थाही उरलासुरला निसर्ग, उरलंसुरलं पर्यावरण राक्षसी वेगाने संपवत चालल्या आहेत. पण कितीही वैषम्य आलं, नैराश्य दाटलं, तरी पर्यावरण पत्रकार या नात्याने ही भली बुरी माहिती वाचकांपर्यंत पोहोचत राहिलीच पाहिजे, ही धारणा अद्याप शाबूत आहे. बऱ्याच वेळा, मुख्य प्रवाहातल्या

प्रादेशिक माध्यमांनी बातम्या योग्य रीतीने न पोचवल्यामुळे, किंवा या विषयांमधले भेडसावणाऱ्या ज्वलंत प्रश्नांचं त्यांनी अग्रक्रमानं वार्तांकन न केल्यामुळे अनेक वेळा पर्यावरणीय घटनांबाबत सर्वसामान्य नागरिकांच्या प्रतिक्रिया आणि वर्तन नेमकं चुकीच्या दिशेने गेल्याचं दिसतं. पर्यावरणीय प्रश्न मतप्रभावी (इलेक्टोरल मेरीट असणारे) ठरत नाहीत. ही निष्क्रियता जशी वाढते, तशा शासनव्यवस्था नव्या उत्साहाने निसर्ग संपवू लागतात. विशेषतः 2014 पासून ही प्रक्रिया किती वेगवान रीतीने होते आहे ते पुस्तकात मांडलं आहेच. पण माध्यमांच्या या पापात आपला तरी सहभाग नाहीये ही एक समाधानाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. आणि त्यासाठीच ज्या माध्यमांमध्ये मला हे लेखन करता आलं, त्या सर्वांपरी कृतज्ञताही इथे व्यक्त करतो.

सदर पुस्तकातील आशय चार विभागांमध्ये वेगळा करून दिला आहे. 'तरंग' विभागातील लेख एखादी घटना, प्रक्रिया आणि त्याच्याआड दडलेलं सत्य दाखवतात. 'अंतरंग' विभाग काही तथ्ये मांडतो. यथायोग्य आकडेवारीची मदत आपल्या प्रतिपादनात घेऊन हिमनगाचा, खालचा, अदृश्य 7/8 भाग दाखवण्याचा प्रयत्न करतो. परिचय विभाग बहुतांशी काही अत्यंत सशक्त, सकारात्मक कार्य करणाऱ्या काही व्यक्ती, काही समूह आणि जागतिक पातळीवरील संस्था परिचित करून देतो. अजून सगळं संपलेलं तर नाहीच, पण प्रयत्न केले तर सृष्टीचं भलं कसं होऊ शकतं, हे ह्या विभागातील लेख वाचकांपुढे ठेवू पहातात. चिंतन विभागात तीन

प्रदीर्घ लेख आहेत. पैकी एक, साहित्यातल्या समाजशास्त्राच्या अंगानं प्रातिनिधिक, अर्वाचीन मराठी साहित्यात उमटलेलं निसर्ग-पर्यावरण आणि पर्यावरणीय संवादशास्त्राच्या (environmental communication) परिप्रेक्ष्यातून त्याचं महत्व काय आहे, हा आहे. कित्येक वर्षं डोक्यात घोळत असलेला हा लेख सदर पुस्तकाच्या निमित्ताने पूर्ण करता आला. आणि दुसरा, आजच्या घडीला मराठीमध्ये सर्वात सुस्पष्ट आणि कृतीशील पर्यावरण विचार मांडणारे, तो जसाच्या तसा प्रत्यक्षात उतरवून रोज जगणारे, 'गतिमान संतुलन'चे श्री.दिलीप कुलकर्णी यांच्या लेखनातील वैचारिक मांडणीचा पर्यावरणीय संवादशास्त्राच्या मूलतत्वांच्या आधारे घेतलेला परामर्श आहे. तिसरा लेख माझाच एक प्रदीर्घ प्रवास मांडतो. 'माझ्या पर्यावरणीय लेखन-पत्रकारितेची वीस वर्षे'. ह्या लेखातही तसा एक गुप्त हेतू आहेच. वीस वर्षांच्या आपल्या प्रवासाबद्दल बोलताबोलता समकालीन मराठी पर्यावरण पत्रकारितेच्या सद्यःस्थितीवर, काही साधकबाधक गोष्टींविषयी काही चर्चा करता येईल. एखाद्या मुक्त पत्रकाराचा प्रवास कसकसा होतो ते वाचकांपर्यंत पोहोचेल. वाचकांना आणि स्वतःला कदाचित त्यातून काही कामाचं गवसेल, हा तो हेतू. याच विभागात पर्यावरणीय संघटनांचा 'हरित जाहीरनामा' ही मुद्दाम पुनर्मुद्रित केला आहे. पर्यावरणवाद्यांकडचे आंधळ्या विकासाला विरोध करतानाचे समर्थ पर्याय तो वाचकांपुढे ठेवतो.

वाचकांची माहिती अद्ययावत राहावी म्हणून आवश्यक तिथे लेखाच्या पूर्वप्रसिद्धीनंतर घडलेल्या घटना, नंतर हाती आलेली माहिती ही लेखाच्या अखेरीस दिली आहे.

सदर पुस्तक वाचून मराठी वाचकांची निसर्ग-पर्यावरण विषयांशी कृतीशील आणि वैचारिक जवळीक वाढेल, रोजच्या जगण्यापासून ते राज्यकर्ते निवडण्यापर्यंत त्यांचे अग्रक्रम अधिक निसर्गस्नेही होतील, आणि आपला देश आणि आपली पृथ्वी संतुलित राहण्यात या सर्वांचा काही निश्चित वाटा असेल या आशावादासह थांबतो.

*संतोष शिंत्रे, पुणे*

# अनुक्रमणिका

## विभाग पहिला : तरंग


जागतिक पर्यावरण निर्देशांक, 2018 - भारताची घसरण 12

नैसर्गिक संपदेची घातक शिकार 17

बॉन, भारत आणि भविष्यकाळ 23

मुंगीच्या पावलांनी वाढणारे गजक्षेत्र 28

पर्यावरणीय संघर्षाची जीवघेणी बाजू 33

अर्थसंकल्प 2017 - पर्यावरणाच्या उरकलेल्या गोष्टी 39

वन्य जीवांसाठी सरसावली साइट्स 44

प्राणी जाती जीवानिशी... 48

असता जलमय, बनती मृगजळ 53

व्याघ्र परिषदेतील आणाभाका आणि वास्तव 60

अर्थ, संकल्प आणि पर्यावरण 64

पर्यावरणीय आरशातील चेहरा 68

ELAB कायद्याचा पर्यावरणावर घाला 73

लकव्याकडून चकव्याकडे 78

2015-16 चा अर्थसंकल्प-निसर्ग चळवळीपुढे आव्हान 83

वाढले वाघ तरी... 87

विकासाची निसर्गविन्मुख वाट धोक्याची 93

चीन-अमेरिका भानावर, भारताचे काय? 98

एव्हरेस्ट आणि ॲप 103

## विभाग दुसरा : अंतरंग

व्यवसायाची सुलभता, मूलस्त्रोतांची दुर्लभता 106

उरतील हाती फक्त मंजुऱ्या, त्याही कागदी... 115

पुस्तके आणि ई-पुस्तके.... कोण निसर्गस्नेही ? 120

निसर्गाचे मूल्यांकन, सामान्यांचा जीडीपी 123

पुण्यातील पर्यावरणीय कृतिशीलता 128

ओळख - 'हरित राजकारण' संकल्पनेची 136

तापमानवाढीची मुळाक्षरे 144

## विभाग तिसरा : परिचय

शेतकऱ्यांचा बुलंद वैश्विक आवाज: 'ला व्हिया कँपेसिना' 149

घुसमट 'अरल'ची 154

काही कार्यरत संस्था 159

प्रकाश गोळे यांना आदरांजली 189

## विभाग चौथा: चिंतन

प्रातिनिधिक मराठी साहित्यात आजवर उमटलेले पर्यावरण 193

दिलीप कुलकर्णी यांच्या लेखनातील वैचारिक मांडणी 222

माझ्या पर्यावरणीय लेखन-पत्रकारितेची वीस वर्षे 233

भारतासाठी हरित जाहीरनामा 249

# विभाग पहिला : तरंग

*The first sign of tyranny is the government's complicity in privatizing the commons for private gain.*

*-Robert F. Kennedy*